DAY — **14** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | III | 01 | 1500 | J-355 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# ECONOMICS (49)

Time : 3 Hrs. (7 Pages) Max. Marks : 80

**सूचना :** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.*

*(३) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(४) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.*

**प्र. १. (अ)** आर्थिक पारिभाषिक शब्द लिहा : (५) **[२०]**

*(i)* आर्थिक शक्तीचे पाठबळ असलेली इच्छा.

*(ii)* मागणीनुसार पैसे काढल्या जाणाऱ्या ठेवी.

*(iii)* उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या भांडवली वस्तूंची होणारी झीज.

*(iv)* किंमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणाइतकीच वस्तूच्या मागणीत शेकडा बदल घडवणारी लवचिकता.

*(v)* विशिष्ट कालावधीतील देशाच्या आयात व निर्यात मूल्यातील फरक.

**(ब)** सहसंबंध पूर्ण करा : (५)

*(i)* अंतर्गत व्यापार : गृह व्यापार : : आंतरराष्ट्रीय व्यापार : ______

*(ii)* भिन्न किंमत : ______ : : एकच किंमत : पूर्ण स्पर्धा

(iii) [ ] : मध्यवर्ती बँक : : *SBI* : व्यापारी बँक

(iv) उत्पादन पद्धत : [ ] : : उत्पन्न पद्धत : घटक पद्धती

(v) आर्थिक तेजीचा कालखंड : शिलकीचे अंदाजपत्रक : : आर्थिक मंदीचा कालखंड : [ ]

**(क)** विसंगत शब्द ओळखा : (५)

(i) टिकाऊ वस्तू :

फर्निचर, कपाट, धुलाई यंत्र, मासे

(ii) खर्च संकल्पना :

एकूण खर्च, सरासरी खर्च, सीमांत खर्च, विक्री खर्च

(iii) कायदेशीर मक्तेदारी :

पेटंट, ओपेक, स्वामित्व अधिकार, बोधचिन्ह

(iv) आर्थिक कल्याणाचे सिद्धांत:

उत्पन्न व रोजगार सिद्धांत, उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता, उपभोग क्षेत्रातील कार्यक्षमता, एकूण आर्थिक कार्यक्षमता

(v) मागणी नियमाचे अपवाद :

गिफेनचा विरोधाभास, प्रतिष्ठेच्या वस्तू, किंमतीचा आभास,श्रमाचा पुरवठा

**(ड)** खालील विधाने पूर्ण करा : (५)

(i) सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र या संज्ञांचा वापर करणारे नॉर्वेजियन अर्थशास्त्रज्ञ -------

(अ) ॲडम स्मिथ

(ब) जे.एम. केन्स

(क) जे.बी.से.

(ड) रॅग्नर फ्रिश

(ii) जेव्हा पुरवठा वक्र वरच्या दिशेने जातो तेव्हा त्याचा असणारा उतार ------- असतो.

(अ) धनात्मक

(ब) ऋणात्मक

(क) प्रथम धनात्मक नंतर ऋणात्मक

(ड) शून्य

(iii) किंमत निर्देशांकाचा उपयोग -------

(अ) वस्तूंच्या किमतीतील सामान्य बदलाचे मापन करण्यासाठी

(ब) भौगोलिक साधन म्हणून

(क) हवेच्या दाबाचे मोजमाप करण्यासाठी

(ड) वस्तूंचे मोजमाप करण्यासाठी

(iv) विकास वित्तीय संस्था स्थापन करण्यात आल्या कारण त्या ------

(अ) अल्प मुदतीसाठी निधी उपलब्ध करून देतात

(ब) उद्योग, कृषी आणि इतर मुख्य क्षेत्रांचा विकास वाढविण्यासाठी मदत करतात

(क) नाणे बाजाराचे नियमन करतात

(ड) भांडवल बाजाराचे नियमन करतात

(v) सरकारचे अनिवार्य (सक्तीचे) कार्य -------

(अ) शिक्षण व आरोग्य सेवांची तरतूद

(ब) निवृत्ती वेतनाची तरतूद

(क) अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखणे

(ड) कल्याणकारी योजनांची तरतूद

**प्र. २.** **(अ)** खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६) **[१२]**

(i) अभिजीतला १५ खुर्च्या विकल्यानंतर ₹ ३००० मिळतात. प्रति खुर्ची त्याला ₹ २०० ची प्राप्ती होते.

*(ii)* राजारामने २५ क्विंटल गव्हाचे उत्पादन आपल्या शेतीत घेतले, त्यापैकी २ क्विंटल गहू स्वत:च्या कुटुंबासाठी बाजूला काढला.

*(iii)* राणीने भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती अभ्यासासाठी संकलित केली.

*(iv)* अमरने आपली चहाची गरज भागविण्यासाठी दूध, साखर व चहापूड यांची एकत्रितपणे मागणी केली.

*(v)* सुनिता मॅडमने आपली फळ्यावर लिहिण्याची गरज खडूचा वापर करून पूर्ण केली.

**(ब)** फरक स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) : (६)

*(i)* सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र

*(ii)* संपूर्ण लवचीक मागणी आणि संपूर्ण अलवचीक मागणी

*(iii)* संख्यात्मक निर्देशांक आणि मूल्य निर्देशांक

*(iv)* अंतर्गत कर्ज आणि बाह्य कर्ज

*(v)* पुरवठ्याचा विस्तार आणि पुरवठ्यातील वाढ

**प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही <u>तीन</u>) : [१२]**

*(i)* सूक्ष्म अर्थशास्त्राची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

*(ii)* व्यापारी बँकेची कार्ये स्पष्ट करा.

*(iii)* काळानुसार बाजाराचे प्रकार स्पष्ट करा.

*(iv)* खालील आकडेवारीवरून किंमत निर्देशांक काढा.

| वस्तू | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| २००५ च्या किंमती (₹) | ६ | १६ | २४ | ४ |
| २०१० च्या किंमती (₹) | ८ | १८ | २८ | ६ |

(*v*) भारतातील विदेशी व्यापाराची भूमिका कोणत्याही चार मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.

**प्र. ४. खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(*i*) मागणी वक्र हा डावीकडून उजवीकडे वरून खाली येतो.

(*ii*) निर्देशांकाना कोणत्याही मर्यादा नाहीत.

(*iii*) मागणीची लवचिकता अनेक घटकांवर अवलंबून असते.

(*iv*) पुरवठा नियमाला काही अपवाद आहेत.

(*v*) भारतीय अर्थव्यवस्थेत भांडवल बाजार अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

**प्र. ५. खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**


(*i*) तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४)

| **किंमत ( ₹ )** | **मागणी ( किलो )** | | | **बाजार मागणी ( किलो ) अ + ब + क** |
|---|---|---|---|---|
| | **उपभोक्ता 'अ'** | **उपभोक्ता 'ब'** | **उपभोक्ता 'क'** | |
| ३५ | ५ | १० | १५ | ☐ |
| ३० | १० | १५ | २० | ☐ |
| २५ | १५ | २० | २५ | ☐ |
| २० | २० | २५ | ३० | ☐ |

(अ) वरील बाजार मागणी पत्रक पूर्ण करा. (२)

(ब) वरील बाजार मागणी पत्रकाच्या सहाय्याने बाजार मागणी वक्र तयार करा. (२)

(*ii*) खालील आकृती अरेखीय मागणी वक्राची आहे. आकृतीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : **(४)**




(१) जर सब = सक $(Ed = 1) =$ ............. (१)

(२) जर सब > सक $(Ed > 1) =$ ............. (१)

(३) जर सब < सक $(Ed < 1) =$ ............. (१)

(४) 'क्ष' अक्षावर वस्तूची ......... दर्शविली आहे आणि 'य' अक्षावर वस्तूची ......... दर्शविली आहे. (१)

(*iii*) नियंत्रित बाजार : **(४)**

नियंत्रित बाजार हा असा घाऊक बाजार असतो की, जेथील खरेदी–विक्रीचे व्यवहार राज्य सरकार बाजार समिती मार्फत नियंत्रित करते.

नियंत्रित बाजाराचा प्रमुख उद्देश विक्रेते आणि उत्पादक यांना विविध सुविधा उपलब्ध करून देणे तसेच बाजारातील अनैतिक, अनिष्ठ प्रथा आणि अप्रामाणिकपणा, फसवेगिरी यांचे प्रमाण नियंत्रित करणे हे असते. प्रामुख्याने कृषी विपणन बाजारात प्राथमिक आणि दुय्यम बाजारपेठेतील चुकीची मानके जसे की रोखीचे व्यवहार, कमी वजने, जास्त बाजार शुल्क, अनधिकृत कपाती

तसेच विक्रेते आणि खरेदीदार यांच्यातील वाद मिटविण्यासाठी यंत्रणेचा अभाव यासारखे अडथळे आहेत. सर्व दोष आणि अडथळे नियंत्रित बाजाराच्या स्थापने द्वारे दूर केले जाते.

१९३९ मध्ये करण्यात आलेल्या 'बॉम्बे ॲग्रिकल्चर प्रोडक्ट मार्केट ॲक्ट' नुसार या बाजारपेठा नियंत्रित केल्या जातात. या बाजारपेठांमध्ये प्रामुख्याने तृणधान्य, फळे, तंबाखू, कापूस, भुईमूग, धान्य, नारळ, सुपारी, बटाटे आणि हळद यांचा व्यापार नियंत्रित केला जातो.

प्रश्न :

(१) कोणत्या ॲक्टनुसार बाजारपेठा नियंत्रित केल्या जातात? (१)

(२) प्राथमिक आणि दुय्यम बाजारपेठेतील चुकीची मानके कोणती? (१)

(३) वरील उताऱ्याविषयी आपले मत लिहा. (२)

**प्र. ६. सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[१६]**

*(i)* घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत स्पष्ट करून गृहीतके स्पष्ट करा.

*(ii)* राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ सांगून राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

*(iii)* शासनाच्या सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कारणे स्पष्ट करा.

◆◆◆